संक्षिप्त



जुन्नर येथे दिंडी सोहळ्यात सहभागी झालेली मुले.

## जुन्नरला चिमुकल्यांचा दिंडी सोहळा

**जुन्नर :** संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा आणि एकादशीनिमित्त सोमवारी जुन्नर येथे चिमुकल्यांनी पायी दिंडी सोहळ्याचा आनंद घेतला. शंकरराव बुट्टे पाटील इंग्लिश मीडियम प्री प्रायमरी विभागातील मुलांनी काढलेला हा दिंडी सोहळा ग्रामदैवत सिद्धिविनायक गणपती मंदिरापासून सुरू झाला. याची सांगता सराई पेठ येथील विठ्ठल मंदिरात पालखी पूजा व सामूहिक पसायदानाने झाली. संस्थेचे अध्यक्ष संभाजी बुट्टे, कार्याध्यक्ष राहुल जोशी, सचिव धनेश संचेती आदी उपस्थित होते. मुख्याध्यापिका गायत्री काजळे, विभागप्रमुख रितिका हिंदुजा यांनी याचे नियोजन केले होते.